# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## वित्त व लेखा विभाग

फोन : २५६९९५३५, २५६०१२३६/३७
फॅक्स : (०२०) २५६९०३३४
ई-मेल: fao@unipune.ac.in

नवीन प्रशासन भवन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.


**संदर्भः- वित्त/परीक्षा वित्त/२०२०-२१/१६९** **दि. ३०/०९/२०२०**

**स्मरणपत्र**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

महोदय/महोदया,

विद्यापीठ परीक्षा आयोजनाच्या कामासाठी दिलेल्या अग्रीम रकमांचे हिशोब लेखी/तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठाला वेळेत सादर करणे आवश्यक आहे. कोरोना विषाणुच्या सार्सगिक रोगामुळे आरोग्यविषयक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे, ज्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थांनी ऑक्टो/नोव्हें-२०१९ पर्यंतच्या परीक्षांचे हिशोब अद्यापपर्यंत विद्यापीठाला सादर केलेले नाहीत. त्यांनी ऑक्टो/नोव्हें-२०१९ पर्यंतच्या परीक्षांचे हिशोब **दि. ३० ऑक्टोबर, २०२० पर्यंत** परीक्षा वित्त विभागात प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पाठविण्यात यावेत. तसेच, ऑक्टो/नोव्हें-२०१९ परीक्षांचे हिशोब ३० ऑक्टोबर, २०२० नंतर सादर केल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ABPatankar
06/10/20

सीए. श्री. अतुल पाटणकर
वित्त व लेखा अधिकारी